PRECISE

SAMPLE CONTENT

# इतिहास व राज्यशास्त्र

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित




इयत्ता
## दहावी
(मराठी व सेमी इंग्रजी माध्यम)


मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)



Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ०४
यांच्याद्वारे नियोजित अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

PRECISE

# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता दहावी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- ☞ अद्ययावत पाठ्यपुस्तक व कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित.
- ☞ एका दृष्टिक्षेपात पाठाचा परिपूर्ण आढावा.
- ☞ अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यानुसार प्रश्नांची मांडणी.
- ☞ पाठाधारित सर्व प्रश्नांचा समावेश.
- ☞ संपूर्ण पाठाचे आकलन व बोर्डाच्या परीक्षेचा सराव यांकरिता अधिकच्या प्रश्नांचा समावेश.
- ☞ सर्व पाठांतर्गत प्रश्नांचा समावेश व आवश्यकतेनुसार उत्तरे अंतर्भूत.
- ☞ जुलै २०२३ पर्यंतच्या बोर्ड कृतिपत्रिकेतील निवडक प्रश्नांचा समावेश.
- ☞ ज्ञानवर्धक व रंजक माहिती देणारा 'ज्ञानगुरू (**GG**)' अंतर्भूत.
- ☞ मार्च २०२४ ची बोर्डाची कृतिपत्रिका समाविष्ट. (Q. R. Code द्वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.)

Sample Content

Printed at: **Jasmine Art Printers Pvt. Ltd.,** Navi Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007 **TEID: 3570** P.O. No. 13026

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने इयत्ता दहावीच्या इतिहास आणि राज्यशास्त्र या पुस्तकाची मांडणी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने केली आहे. यातील इतिहास विषयाची मांडणी उपयोजनाच्या दृष्टिकोनातून करण्यात आली असून भारताचा भावी जागरूक नागरिक घडवण्याच्या दृष्टीने राज्यशास्त्राची मांडणी करण्यात आली आहे. हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून या विषयाच्या सुलभ अभ्यासासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे PRECISE इतिहास व राज्यशास्त्र: इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

अद्ययावत अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना सर्वार्थाने उपयुक्त असे अभ्यासपूरक साहित्य उपलब्ध करून देणे हा या पुस्तक निर्मितीमागील मुख्य उद्देश आहे. पाठाच्या ओघानुसार प्रश्नांची क्रमवार मांडणी हे आमच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला 'एक दृष्टिक्षेप' या शीर्षकांतर्गत आकृतिबंध, तक्ता व ओघतक्ता या स्वरूपात पाठाचा परिचय देण्यात आला आहे. अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार सर्व प्रकारच्या प्रश्नांची रचना केली आहे. स्वाध्यायातील सर्व प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे दिली आहेत. त्याचबरोबर संपूर्ण पाठाच्या आकलनासाठी अधिकचे वैविध्यपूर्ण प्रश्नदेखील सोडवून दिले आहेत.

पाठांतर्गत प्रश्न विभागामध्ये यादी करा, चला शोधूयात, चर्चा करा, विचार करा व लिहा, सांगा पाहू, तुम्हांला काय वाटते, असे का? यांसारख्या पाठांतर्गत प्रश्नांचा, समावेश केला आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे मुद्देसूद व सोदाहरण दिली असून आवश्यक तेथे संदर्भ आणि मार्गदर्शकपर मुद्दे दिले आहेत. तसेच स्वाध्यायातील उपक्रमांची आवश्यकतेनुसार उत्तरे **Q.R. Code** द्वारे देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने विषयाचा सराव व तयारी व्हावी याकरिता जुलै २०२३ पर्यंतच्या बोर्ड प्रश्नपत्रिकेतील निवडक प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, याची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत.

आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही विनंती: support@lazybone.in

**अभिनव अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा!**

प्रकाशक

**आवृत्ती:** चौथी

## ज्ञानगुरू (GG)




**ज्ञानगुरू** नावाचा एक खास मित्र आम्ही तुमच्या भेटीस घेऊन येत आहोत. हा तुमचा लाडका मित्र बनून या पुस्तकात तुम्हांला भेटेल. जो आपल्या माहितीद्वारे तुमचे ज्ञान वाढवण्यास व संकल्पना स्पष्ट करण्यास मदत करेल. ज्ञानाची आपल्या जीवनाशी सांगड घालता यावी यासाठी आम्ही केलेला हा एक प्रयत्न आहे. यामुळे, तुम्हांला ज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन करणे सुलभ होईल.

हा नवीन मित्र तुम्हांला नक्कीच आवडेल.


**Disclaimer**

This reference book is transformative work based on ' इतिहास व राज्यशास्त्र' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.



Sample Content

# ठळक वैशिष्ट्ये

### कृतिपत्रिका आराखडा

विद्यार्थ्यांना कृतिपत्रिकेचे स्वरूप स्पष्ट व्हावे, याकरता अद्ययावत कृतिपत्रिका आराखडा देण्यात आला आहे.

### आकलन हेतू स्पष्टीकरण

विद्यार्थ्यांना प्रश्नांच्या उत्तरांमागची मूळ संकल्पना व मुद्दे व्यवस्थित समजून घेता यावेत, यासाठी आवश्यक तेथे 'आकलन हेतू स्पष्टीकरण' (उत्तराचा भाग नसलेले) देण्यात आले आहे.

### एक दृष्टिक्षेप

'एक दृष्टिक्षेप' या शीर्षकांतर्गत पाठाचा परिचय मुद्दे व तक्ते या स्वरूपात देण्यात आला आहे.

### पाठांतर्गत प्रश्न

पाठांतर्गत प्रश्न या विभागामध्ये यादी करूया, करून पाहा यांसारख्या उत्तरांसहीत समावेश केला आहे.

### विविध प्रश्नप्रकार अंतर्भूत

अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार प्रश्नांची मांडणी केली आहे.

### उपक्रम

उपक्रमांची उत्तरे Q. R. Code मार्फत उपलब्ध करून दिली आहेत.

### बोर्ड कृतिपत्रिकेतील प्रश्न

मार्च २०१९, २०२०, डिसेंबर २०२०, मार्च व जुलै २०२२, तसेच मार्च व जुलै २०२३ च्या बोर्ड परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

### ज्ञानगुरू

विद्यार्थ्यांना पाठातील आशयासंबंधित अधिकची अभिरुचीपूर्ण माहिती 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत उपलब्ध करून दिली आहे.

### उताऱ्यावर आधारित प्रश्न

विद्यार्थ्यांना उताऱ्यावर आधारित प्रश्नाचा सराव व्हावा यादृष्टीने आवश्यकतेनुसार प्रश्न क्र. ४ मध्ये एकापेक्षा जास्त उतारे व त्यावर आधारित प्रश्नांचा समावेश केला आहे.

### बोर्ड कृतिपत्रिका

मार्च २०२४ ची बोर्ड कृतिपत्रिका देण्यात आली असून उत्तरपत्रिका Q. R. Code द्वारे पुरवण्यात आली आहे.

### चित्रावर आधारित प्रश्न

सरावाकरता चित्रावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

Sample Content

# अद्ययावत कृतिपत्रिका आराखडा

**इयत्ता दहावी: इतिहास व राज्यशास्त्र**

**(इतिहास : २८ गुण, राज्यशास्त्र : १२ गुण)**

**वेळ: २ तास** **एकूण गुण: ४०**

## इतिहास

| प्र.क्र. | प्रश्नाचे स्वरूप | | विकल्प | गुण | विकल्पांसह एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| प्र.१. | अ. | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. | - | ०३ | ०३ |
| | ब. | पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा. | - | ०३ | ०३ |
| प्र.२. | अ. | दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. यामध्ये संकल्पनाचित्र, तक्ता पूर्ण करा, कालरेषा तयार करा, ओघतक्ता तयार करा, घटना कालानुक्रमे योग्य ठिकाणी दर्शवा असे प्रश्न प्रकार येतील. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| | ब. | टिपा लिहा. / संकल्पना स्पष्ट करा. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| प्र.३. | पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. | | ४ पैकी २ | ०४ | ०८ |
| प्र.४. | दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. (यामध्ये प्रत्येकी १ गुणांचे २ प्रश्न व २ गुणांचा १ मुक्तोत्तरी प्रश्न असतील.) | | - | ०४ | ०४ |
| प्र.५. | पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. | | ४ पैकी २ | ०६ | १२ |
| | **एकूण गुण** | | | **२८** | **४२** |

## राज्यशास्त्र

| प्र.क्र. | प्रश्नाचे स्वरूप | | विकल्प | गुण | विकल्पांसह एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| प्र.६. | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. | | - | ०२ | ०२ |
| प्र.७. | पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. | | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| प्र.८. | अ. | पुढील संकल्पना स्पष्ट करा. | २ पैकी १ | ०२ | ०४ |
| | ब. | दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. यात तक्ता पूर्ण करा, कालरेषा पूर्ण करा. पायऱ्या लिहा, ओघतक्ता पूर्ण करा, संकल्पनाचित्र पूर्ण करा असे प्रश्न असतील. | २ पैकी १ | ०२ | ०४ |
| प्र.९. | पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. | | २ पैकी १ | ०२ | ०४ |
| | **एकूण गुण** | | | **१२** | **२०** |

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्रमांक | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| १ | इतिहासलेखन : पाश्चात्त्य परंपरा | १ |
| २ | इतिहासलेखन : भारतीय परंपरा | ९ |
| ३ | उपयोजित इतिहास | २१ |
| ४ | भारतीय कलांचा इतिहास | ३१ |
| ५ | प्रसारमाध्यमे आणि इतिहास | ४२ |
| ६ | मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास | ५४ |
| ७ | खेळ आणि इतिहास | ६७ |
| ८ | पर्यटन आणि इतिहास | ७७ |
| ९ | ऐतिहासिक ठेव्यांचे जतन | ८९ |
| | **राज्यशास्त्र** | |
| १ | संविधानाची वाटचाल | १०३ |
| २ | निवडणूक प्रक्रिया | ११५ |
| ३ | राजकीय पक्ष | १२६ |
| ४ | सामाजिक व राजकीय चळवळी | १३६ |
| ५ | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने | १४५ |
| • | बोर्ड कृतिपत्रिका: मार्च २०२४ (Q. R. Code द्‌वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.) | १५२ |


**[टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

## आकलन हेतू स्पष्टीकरण

**आकलन हेतू स्पष्टीकरण या शीर्षकाखाली दिलेले स्पष्टीकरण हा उत्तराचा भाग म्हणून परीक्षेत लिहिणे अपेक्षित नाही. ते देण्यामागचा उद्देश फक्त उत्तरातील संकल्पना प्रभावीपणे विद्यार्थ्यांना समजाव्यात हा आहे.**

**1. विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेतात.**

**उत्तर:** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण:**

i. तसेच, विधानसभा, लोकसभा आणि स्थानिक शासनसंस्थांमधील एखाद्या लोकप्रतिनिधीने राजीनामा दिला किंवा एखाद्या लोकप्रतिनिधीचा मृत्यू झाला, तर ती जागा रिक्त होते. त्या जागेकरता निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात 'पोटनिवडणूक' घेते.

ii. विशिष्ट परिस्थितीमध्ये एखाद्या मतदारसंघात निवडणुकांबाबत काही वाद निर्माण झाल्यास, ते सोडवण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते. त्यानुसार, एखाद्या मतदारसंघात निवडणूक आयोग पुन्हा निवडणुका घेते.

वरील मुद्दे लक्षात घेता विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेतात असे म्हणता येते.

**उत्तर**

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

वर उल्लेखलेल्या स्थितीबरोबरच दर पाच वर्षांनी लोकसभेच्या निवडणुका होतात. त्यांना 'सार्वत्रिक निवडणुका' असे म्हणतात. तथापि, विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेतात.

**उत्तराचा भाग नाही.**

बोर्डाच्या परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी नमुना प्रश्नपत्रिका सोडवणे हा एक उत्तम मार्ग आहे. शेजारील Q. R. Code स्कॅन करून आमच्या "**SSC 54 प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका उत्तरपत्रिकांसहित**" याविषयी जाणून घ्या.

शेवटच्या क्षणी संपूर्ण पुस्तकाचा अभ्यास करणे अवघड वाटते का?
आमच्या "**Important Question Bank (IQB)**" या पुस्तकातून महत्त्वाच्या प्रश्नांची झटपट उजळणी करा. अधिक माहितीकरिता पुढील Q. R. Code स्कॅन करा.

Sample content

# १ इतिहासलेखन : पाश्चात्त्य परंपरा



## एक दृष्टिक्षेप

**इतिहासलेखन**

**व्याख्या**

उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून भूतकालीन घटनांची मांडणी करणे.

**ज्ञानशाखा**

पुरातत्त्व, पुराभिलेख, अभिलेखागार, हस्तलिखितांचा अभ्यास, अक्षरवटिकाशास्त्र, भाषारचनाशास्त्र, नाणकशास्त्र, वंशावळींचा अभ्यास इत्यादी.

**प्रकार**

**प्राचीन परंपरा**

गुहाचित्रे,
शिलालेख,
कथा,
पोवाडे इत्यादी.

**आधुनिक इतिहासलेखन**

- शास्त्रशुद्ध मांडणी
- मानवकेंद्रित
- विश्वासार्ह पुराव्यांचा आधार
- मानवाच्या वाटचालीचा वेध इत्यादी.

**युरोपातील इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये**

- तत्त्वज्ञान व विज्ञानामधील प्रगतीमुळे वैज्ञानिकदृष्ट्या सामाजिक व ऐतिहासिक वास्तवांचा अभ्यास.
- इतिहास व इतिहासलेखन यांबाबतच्या विचारमंथनातून इतिहासलेखनामध्ये वस्तुनिष्ठतेला महत्त्व.

**ॲनल्स प्रणाली-**

- ही इतिहासलेखनाची नवीन प्रणाली फ्रान्समध्ये उदयास आली.
- इतिहासामध्ये युद्ध, राजे यांबरोबरच हवामान, शेती, स्थानिक लोक, व्यापार, तंत्रज्ञान, संपर्कसाधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांच्या अभ्यासावरही भर.

**स्त्रीवादी इतिहासलेखन-**

- स्त्रियांच्या दृष्टिकोनातून इतिहासाची पुनर्रचना
- सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.
- यानुसार इतिहासलेखनात स्त्रियांचा अंतर्भाव करणे.
- त्याबरोबरच पुरुषप्रधान विचारप्रणालीचा पुनर्विचार करण्यावर भर.

**युरोपातील विचारवंत व इतिहासकार:**

| तत्त्वज्ञाचे नाव | पुस्तक | इतिहासलेखनाबाबतचे विचार |
|---|---|---|
| रेने देकार्त (फ्रेंच तत्त्वज्ञ) (१५९६ – १६५०) | डिस्कोर्स ऑन द मेथड | • ऐतिहासिक साधनांची विशेषत: कागदपत्रांची विश्वासार्हता तपासणे. |
| व्हॉल्टेअर (फ्रान्स्वा मरी अरूए) (फ्रेंच तत्त्वज्ञ) (१६९४ – १७७८) आधुनिक इतिहासलेखनाचा जनक | | • इतिहासलेखनामध्ये मानवी जीवनाचा सर्वांगीण (तत्कालीन सामाजिक परंपरा, व्यापार, आर्थिक व्यवस्था, शेती इ.) विचार होणे आवश्यक. |

Sample Content

| | | |
|---|---|---|
| जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल (जर्मन तत्त्वज्ञ) (१७७० – १८३१) | • एनसायक्लोपीडिया ऑफ फिलॉसॉफिकल सायन्सेस (या पुस्तकात हेगेलच्या व्याख्यान व लेखांचे संकलन आहे.)<br>• रिझन इन हिस्टरी | • ऐतिहासिक वास्तव तर्कशुद्ध पद्धतीने मांडणे.<br>• इतिहासातील घटनाक्रम प्रगतीचे टप्पे दर्शवतो.<br>• वेळोवेळी उपलब्ध पुराव्यांनुसार इतिहासकाराने बदलणे स्वाभाविक असते.<br>• **द्वंद्ववाद:** मानवी मनाला घटनेचे आकलन होण्यासाठी ज्या घटनेचा अर्थ लावायचा आहे तिची वर्गवारी दोन विरुद्ध प्रकारांमध्ये करणे. |
| लिओपॉल्ड व्हॉन रांके (जर्मन तत्त्वज्ञ) (१७९५ – १८८६) | • द थिअरी अँण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी<br>• द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी | • मूळ दस्तऐवजांच्या आधारे मिळालेली माहिती सर्वात महत्त्वाची.<br>• ऐतिहासिक घटनांसंदर्भातील कागदपत्रांचा कसून शोध घेणे व सत्यापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे. |
| कार्ल मार्क्स (जर्मन तत्त्वज्ञ) (१८१८ – १८८३) | दास कॅपिटल | • इतिहास हा अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा असतो.<br>• मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. |
| सीमाँ-द-बोव्हा (फ्रेंच विदुषी) | – | • इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करण्यावर भर.<br>• याचबरोबर इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यावर भर. |
| मायकेल फुको (फ्रेंच इतिहासकार) (१९२६ – १९८४) | आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज | • इतिहासाची कालक्रमानुसार अखंड मांडणीची पद्धत चुकीची आहे.<br>• पुरातत्त्वामध्ये भूतकाळातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न असतो. |

Sample Content

**प्र.१.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. इतिहासात उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून, भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखनपद्धतीला _______ असे म्हणतात.
   अ. हस्तलिखितांचा अभ्यास
   ब. वंशावळींचा अभ्यास
   क. इतिहासलेखन
   ड. पुरातत्त्वशास्त्र

२. इतिहासाची चिकित्सापूर्वक मांडणी करणाऱ्या संशोधकाला _______ असे म्हटले जाते.
   अ. मानववंशशास्त्रज्ञ  ब. तत्त्वज्ञ
   क. इतिहासकार  ड. पुरातत्त्वशास्त्रज्ञ

३. ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपोटेमियातील _______ संस्कृतीमध्ये झाली.
   अ. सुमेर  ब. ग्रीक
   क. चिनी  ड. हडप्पा

४. आधुनिक इतिहासलेखनाच्या परंपरेची बीजे प्राचीन _______ इतिहासकारांच्या लेखनात आढळतात.
   अ. भारतीय  ब. जर्मन
   क. ग्रीक  ड. फ्रेंच

५. 'हिस्टरी' हा शब्द _______ भाषेतील आहे.
   अ. इंग्रजी  ब. ग्रीक
   क. फ्रेंच  ड. जर्मन

६. सुमारे ४५०० वर्षांपूर्वीचा सर्वाधिक प्राचीन शिलालेख _______ येथे ठेवण्यात आला आहे.
   अ. भारतीय संग्रहालय, कोलकाता
   ब. लुव्र संग्रहालय, फ्रान्स
   क. लुव्र संग्रहालय, मेसोपोटेमिया
   ड. ब्रिटिश संग्रहालय, इंग्लंड

७. इ. स. पू. ५ व्या शतकात होऊन गेलेल्या _______ या ग्रीक इतिहासकाराने 'हिस्टरी'हा शब्द सर्वप्रथम त्याच्या 'द हिस्टरीज्' या ग्रंथाच्या शीर्षकासाठी वापरला.
   अ. व्हॉल्टेअर  ब. कार्ल मार्क्स
   क. रेने देकार्त  ड. हिरोडोटस

८. 'एखादी गोष्ट सत्य आहे असे निःसंशयरीत्या प्रस्थापित होत नाही तोपर्यंत तिचा स्वीकार कदापि करू नये' हा रेने देकार्त याने लिहिलेल्या ________ या ग्रंथातील एक नियम शास्त्रशुद्ध संशोधनाच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा मानला जातो.
अ. द हिस्टरीज् ब. डिस्कोर्स ऑन द मेथड
क. रिझन इन हिस्टरी ड. दास कॅपिटल

*९. आधुनिक इतिहासलेखनाचा जनक ________ यास म्हणता येईल. [मार्च, डिसें. २०२०]
अ. व्हॉल्टेअर ब. रेने देकार्त
क. लिओपॉल्ड रांके ड. कार्ल मार्क्स

१०. हेगेल हा ________ तत्त्वज्ञ होता.
अ. फ्रेंच ब. स्पॅनिश
क. जर्मन ड. इंग्लिश

११. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ________ इतिहासकारांनी ॲनल्स प्रणाली सुरू केली.
अ. ग्रीक ब. फ्रेंच
क. इंग्लिश ड. डच

१२. सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने ________ मूलभूत भूमिका सिद्ध केली.
अ. मार्क्सवादाची ब. इतिहासाची
क. स्त्रीवादाची ड. उत्खननशास्त्राची

१३. ________ इतिहासलेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना.
अ. स्त्रीवादी ब. सैद्धांतिक
क. राष्ट्रवादी ड. वसाहतवादी

*१४. 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ ________ याने लिहिला.
अ. कार्ल मार्क्स ब. मायकेल फुको
क. लुसिआँ फेबर ड. व्हॉल्टेअर

१५. ________ यांसारख्या विषयांचे इतिहास लिहिले जाऊ लागल्याने आधुनिक इतिहासलेखनाची व्याप्ती विस्तारत गेली.
अ. चित्रपटनिर्मिती ब. साहित्य व चित्रकला
क. स्थापत्य व शिल्पकला ड. वरील सर्व

**उत्तर:**
१. इतिहासलेखन २. इतिहासकार
३. सुमेर ४. ग्रीक
५. ग्रीक
६. लुव्र संग्रहालय, फ्रान्स ७. हिरोडोटस
८. डिस्कोर्स ऑन द मेथड
९. व्हॉल्टेअर
१०. जर्मन ११. फ्रेंच
१२. स्त्रीवादाची १३. स्त्रीवादी
१४. मायकेल फुको १५. वरील सर्व

**प्र.१.(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

*१. **[मार्च २०१९, जुलै २०२२]**

| | | |
|---|---|---|
| i. | जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल | रिझन इन हिस्टरी |
| ii. | लिओपॉल्ड व्हॉन रांके | द थिअरी अँण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी |
| iii. | हिरोडोटस | द हिस्टरिज् |
| iv. | कार्ल मार्क्स | डिस्कोर्स ऑन द मेथड |

२. **[मार्च २०२३]**

| | इतिहासकार | कार्य |
|---|---|---|
| i. | कार्ल मार्क्स | इंग्लंड |
| ii. | मायकेल फुको | फ्रान्स |
| iii. | लिओपॉल्ड व्हॉन रांके | जर्मनी |
| iv. | हिरोडोटस | ग्रीस |

३.


| | इतिहासकार | कार्य |
|---|---|---|
| i. | मायकेल फुको | आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज |
| ii. | रेने देकार्त | डिस्कोर्स ऑन द मेथड |
| iii. | कार्ल मार्क्स | दास कॅपिटल |
| iv. | जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल | द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी |

**उत्तर:**
१. कार्ल मार्क्स – डिस्कोर्स ऑन द मेथड
२. कार्ल मार्क्स – इंग्लंड
३. जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी


**प्र.२.(अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

१.




*२. **[मार्च, जुलै २०२३]**




Sample Content

**उत्तर:**

१. i. अभिलेखागार ii. अक्षरवटिकाशास्त्र
iii. हस्तलिखितांचा अभ्यास
iv. नाणकशास्त्र

२. i. रेने देकार्त ii. व्हॉल्टेअर
iii. जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल
iv. लिओपॉल्ड व्हॉन रांके
v. कार्ल मार्क्स vi. सीमाँ-द-बोव्हा
vii. मायकेल फुको

[**टीप:** विद्यार्थ्यांना वरीलपैकी कोणत्याही चार युरोपीय इतिहास तत्त्वज्ञ व लेखकांची नावे लिहिता येतील.]

**ओघतक्ता पूर्ण करा.**

१.
सिद्धांत
↓
i.
↓
तर्काधिष्ठित ऊहापोह
↓
ii.

**उत्तर:** i. प्रतिसिद्धांत ii. समन्वयात्मक मांडणी

**तक्ता पूर्ण करा.**

१.

| | इतिहासकार | ग्रंथ |
|---|---|---|
| i. | रेने देकार्त | ________ |
| ii. | ________ | रिझन इन हिस्टरी |
| iii. | ________ | दास कॅपिटल |
| iv. | मायकेल फुको | ________ |

**उत्तर:**

| | इतिहासकार | ग्रंथ |
|---|---|---|
| i. | रेने देकार्त | **डिस्कोर्स ऑन द मेथड** |
| ii. | **जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल** | रिझन इन हिस्टरी |
| iii. | **कार्ल मार्क्स** | दास कॅपिटल |
| iv. | मायकेल फुको | **आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज** |

**प्र.२.(ब) टिपा लिहा.**

**१. इतिहासाची संशोधन पद्धती**

**उत्तर:**

i. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची क्रमाने सुसंगती लावून त्यांचे आकलन करून घेण्याच्या उद्देशाने इतिहास संशोधन व लेखन केले जाते आणि ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

ii. यानुसार, इतिहासाची मांडणी करताना वेगवेगळ्या गोष्टी विचारात घेतल्या जातात त्या पुढीलप्रमाणे आहेत.

अ. इतिहासाच्या साधनांचे चिकित्सक संशोधन करणे.

ब. उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक माहितीचे संदर्भ तपासणे.

क. ऐतिहासिक माहितीचे संकलन करणे, ऐतिहासिक बदलांना कारणीभूत ठरणाऱ्या प्रक्रियांचे स्वरूप अधोरेखित करणे व त्यांचे तुलनात्मक विश्लेषण करणे.

ड. विशिष्ट ऐतिहासिक घटनांविषयक उपलब्ध माहितीचे स्थलकालात्मक संदर्भ आकलन करणे. शिवाय, ऐतिहासिक अभ्यासपद्धतीच्या विविध संकल्पनात्मक चौकटींचेही आकलन करून घेणे.

इ. ऐतिहासिक संदर्भाशी निगडित योग्य अशा प्रश्नांची मांडणी करणे.

फ. या प्रश्नांना अनुसरून संभाव्य परिकल्पना मांडणे.

**२. इतिहासलेखनाच्या प्राचीन परंपरा**

**उत्तर:**

i. जगातील विविध प्राचीन संस्कृतींमध्ये इतिहासलेखनाची परंपरा नव्हती; मात्र त्यांना भूतकाळाची जाणीव किंवा जिज्ञासा नव्हती असे म्हणता येत नाही.

ii. कारण त्या काळातही वडिलधाऱ्यांकडून ऐकलेल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या, त्यांच्या जीवनाविषयक गोष्टी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज भासत होती.

iii. म्हणूनच, गुहाचित्रांच्या माध्यमांतून स्मृतींचे जतन, कथा-कहाण्यांचे कथन, गीत व पोवाड्यांचे गायन यांसारख्या परंपरा विविध संस्कृतींमध्ये रूढ होत्या.

iv. आधुनिक इतिहासलेखनामध्येही या परंपरांचा इतिहासाचे साधन म्हणून उपयोग केला जातो.

**३. व्हॉल्टेअर** **[मार्च , जुलै २०२२]**

**उत्तर:**

i. व्हॉल्टेअर या फ्रेंच तत्त्वज्ञाचे मूळ नाव फ्रान्स्वा मरी अरुए हे आहे.

ii. इतिहासलेखन करताना केवळ वस्तुनिष्ठ सत्य आणि घटनांचा कालक्रम यांवर भर न देता, त्यामध्ये तत्कालीन समाजाच्या परंपरा, आर्थिक व्यवस्था, शेती, व्यापार इत्यादींचाही विचार करणे आवश्यक आहे, हा विचार त्याने मांडला.

iii. व्हॉल्टेअरच्या या विचाराच्या प्रभावामुळे इतिहासाच्या मांडणीमध्ये सर्वांगीण मानवी जीवनाचा विचार होणे गरजेचे आहे, असा विचार पुढे आला.

iii. इतिहासलेखनामध्ये सर्वांगीण मानवी जीवनाचा विचार व्हावा, हा आधुनिक विचार मांडल्याने व्हॉल्टेअरला आधुनिक इतिहासलेखनाचा जनक असे म्हणतात.

Sample Content

***४. द्वंद्ववाद** **[मार्च २०२३]**

**उत्तर:**

i. जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल या जर्मन तत्त्वज्ञाने द्वंद्ववाद ही विचार पद्धती मांडली आहे.

ii. हेगेलच्या मतानुसार, कोणत्याही घटनेचा अर्थ लावण्याकरता तिची दोन विरोधी प्रकारांत वर्गवारी करावी लागते, उदा. खरे-खोटे, चूक-बरोबर, चांगले-वाईट. याप्रकारे विचार करण्याच्या पद्धतीला द्वंद्ववाद (डायलेक्टिक्स) असे म्हटले जाते.

iii. या पद्धतीमध्ये प्रथम एक सिद्धांत मांडला जातो. त्यानंतर या सिद्धांताला छेद देणारा (विरोध दर्शवणारा) प्रतिसिद्धांत मांडला जातो.

iv. या दोन्ही सिद्धांतांचा तर्काच्या आधारे ऊहापोह केल्यानंतर त्या दोन्हींचे सार ज्यामध्ये सामावलेले आहे, अशा सिद्धांताची समन्वय साधणारी अशी मांडणी केली जाते.

***५. ॲनल्स प्रणाली** **[डिसें. २०२०]**

**उत्तर:**

i. ॲनल्स प्रणाली ही आधुनिक इतिहासलेखनाची प्रणाली असून विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ती फ्रान्समध्ये उदयास आली.

ii. ही इतिहासलेखन प्रणाली फ्रेंच इतिहासकारांनी सुरू केली.

iii. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनाला एक निराळीच दिशा प्राप्त झाली.

iv. या प्रणालीमध्ये इतिहासाचा अभ्यास केवळ राजे, महान नेते, तसेच त्यांच्या संदर्भाने राजकारण मुत्सद्देगिरी किंवा राजकीय घडामोडी आणि युद्धे यांवरच केंद्रित न करता त्या काळातील हवामान, स्थानिक लोक, शेती व व्यापार, दळणवळण, तंत्रज्ञान, संपर्क साधने, तसेच सामाजिक विभागणी व समूहाची मानसिकता यांसारखे विषयदेखील अभ्यासणे महत्त्वपूर्ण मानले जाऊ लागले.

**प्र.३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

**१. इतिहास संशोधनामध्ये प्रायोगिक पद्धती वापरणे शक्य नाही.**

**उत्तर:**

i. विज्ञानशाखांमध्ये ज्ञानाच्या सत्यतेची पडताळणी करण्याकरता प्रायोगिक पद्धतीचा उपयोग केला जातो.

ii. याच्या आधारे विविध घटनांसंबंधित सार्वत्रिक व सार्वकालिक नियम मांडले जातात, की जे पुन्हा पुन्हा सिद्ध करता येणे शक्य असते.

iii. मात्र, प्रायोगिक पद्धतीने प्रयोग व निरीक्षण करून इतिहास संशोधन करणे शक्य नाही. या सर्व घटना घडून गेलेल्या असल्याने त्या घटनांचे प्रत्यक्ष निरीक्षण आपण केलेले नसते.

iv. शिवाय, या घटनांची पुनरावृत्ती करता येणेदेखील शक्य नसते. त्यामुळे, त्यासंबंधित सार्वत्रिक व सार्वकालिक नियम मांडणे किंवा ते सिद्ध करता येणेही शक्य नसते.

म्हणूनच, विज्ञान शाखांप्रमाणे इतिहास संशोधनामध्ये प्रायोगिक पद्धती वापरणे शक्य नाही.

**२. व्हॉल्टेअर हा आधुनिक इतिहासलेखनाचा जनक होता असे म्हटले जाते.** **[मार्च २०२०]**

**उत्तर:** या प्रश्नाच्या उत्तराकरता ‘टिपा लिहा’ मधील प्र.३ चे उत्तर अभ्यासा.

***३. स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.** **[जुलै २०२२]**

**उत्तर:**

i. स्त्रियांच्या दृष्टिकोनातून इतिहासाची पुनर्रचना करणे म्हणजे स्त्रीवादी इतिहासलेखन होय.

ii. सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका मांडली.

iii. या प्रकारच्या इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करणे त्याचबरोबर या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचाही पुनर्विचार करणे यांवर भर दिला गेला आहे.

iv. वरील कारणास्तव स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलू जसे- कौटुंबिक आयुष्य, नोकरी इत्यादींवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

***४. फुको यांच्या लेखनपद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे.** **[डिसें. २०२०]**

**उत्तर:**

i. विसाव्या शतकामधील फ्रेंच इतिहासकार मायकेल फुको यांच्या लिखाणाच्या माध्यमातून इतिहासलेखनाची एक नवीन संकल्पना पुढे आली.

ii. त्यांनी इतिहासाच्या कालक्रमानुसार केलेल्या अखंड मांडणीला चुकीचे म्हटले आहे.

iii. तसेच, भूतकाळातील स्थित्यंतराचे स्पष्टीकरण देण्यावर भर दिला.

iv. त्यांच्या मते पुरातत्त्वामध्ये अंतिम ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचणे हे उद्दिष्ट नसून भूतकाळातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न असतो.

म्हणूनच, भूतकाळातील स्थित्यंतरांचे ज्ञान देणाऱ्या आपल्या लेखनपद्धतीला त्यांनी ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे.

**प्र.४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१.**

**[इतिहासात उपलब्ध पुराव्यांचे ................**
**................ लेखनाची शैली निश्चित करतात.]**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २)

Sample Content

**प्रश्न:**

i. इतिहासलेखन म्हणजे काय?

ii. इतिहासकारावर इतिहासाची मांडणी का अवलंबून असते?

iii. प्राचीन काळातील लोक ऐतिहासिक घटनांच्या नोंदी ठेवत असतील, असे तुम्हांला वाटते का?

**उत्तर:**

i. उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सकपणे संशोधन करून भूतकाळामध्ये घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखन पद्धतीला इतिहासलेखन म्हणतात.

ii. इतिहासाची मांडणी करत असताना भूतकाळामध्ये घडून गेलेल्या प्रत्येक घटनेची नोंद करून तिची माहिती देणे इतिहासकाराला शक्य नसल्याने वाचकापर्यंत जे पोहोचवायचे आहे, अशाच भूतकाळातील घटनांची निवड करतो व त्याच्या दृष्टिकोनानुसार इतिहासाची मांडणी करतो, म्हणून इतिहासाची मांडणी इतिहासकारावर अवलंबून असते.

iii. प्राचीन काळातील लोक ऐतिहासिक घटनांची नोंद ठेवत असतील असे मला वाटते, कारण -

अ. प्राचीन संस्कृतीमध्ये इतिहासलेखन करण्याची परंपरा नव्हती; परंतु पूर्वजांच्या जीवनाच्या, पराक्रमाच्या गोष्टी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची आवश्यकता त्यांना जाणवत होती.

ब. जगभरातील संस्कृतींमध्ये गुहाचित्रांद्वारे स्मृतींचे जतन, कहाण्यांचे कथन, गीत पोवाड्यांचे गायन यांसारख्या परंपरागत साधनांचा वापर होत असे.

२.

**[इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या ................**
**................ इतिहासाच्या अभ्यासाची केंद्रे बनली.]**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३)

**प्रश्न:**

i. इसवी सनाच्या अठराव्या शतकापर्यंत युरोपमध्ये कोणत्या क्षेत्रामध्ये लक्षणीय प्रगती झाली?

ii. इसवी सनाच्या अठराव्या शतकापूर्वी युरोपातील विद्यापीठांमध्ये कोणत्या विषयांना महत्त्व होते?

iii. जर्मनीतील कोणत्या विद्यापीठामध्ये इतिहासाला स्वतंत्र विषय म्हणून प्रथमच स्थान मिळाले?

iv. वैज्ञानिक प्रगतीचा इतिहासलेखनावर कोणता परिणाम झाला असे तुम्हांला वाटते, ते उदाहरण देऊन स्पष्ट करा.

**उत्तर:**

i. इसवी सनाच्या अठराव्या शतकापर्यंत युरोपमध्ये तत्त्वज्ञान व विज्ञान या क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती झाली.

ii. इसवी सनाच्या अठराव्या शतकापूर्वी युरोपातील विद्यापीठांमध्ये ईश्वरविषयक चर्चा आणि त्यासंबंधीचे तत्त्वज्ञान या विषयांनाच अधिक महत्त्व होते.

iii. इसवी सन १७३७ मध्ये जर्मनीमध्ये स्थापन झालेल्या गॉटिंगेन या विद्यापीठामध्ये प्रथमच इतिहास विषयाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले.

iv. वैज्ञानिक पद्धतीचा इतिहासलेखनावर पुढील परिणाम झाला:

अ. वैज्ञानिक पद्धतीने सामाजिक व ऐतिहासिक वास्तवांचा अभ्यास करता येणे शक्य आहे असा विश्वास विचारवंतांमध्ये निर्माण झाला.

ब. इतिहासलेखनामध्ये वस्तुनिष्ठतेला महत्त्व आले.

क. या संदर्भात काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील.

१. लिओपॉल्ड व्हॉन रांके यांनी इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर टीका करत मूळ दस्तऐवजांच्या आधारे मिळालेली माहिती महत्त्वाची असल्याचे प्रतिपादित केले.

२. हेगेल या जर्मन तत्त्वज्ञाने तर्कशुद्ध पद्धतीने ऐतिहासिक वास्तव मांडले गेले पाहिजे यावर भर दिला.

## प्र.५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

### १. इतिहासाच्या दस्त ऐवजांचे विश्लेषण इतिहासतज्ज्ञ कशारीतीने करतात?

**उत्तर: प्रस्तावना:** भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची क्रमशः संगती लावून त्यांचे आकलन होण्यासाठी संशोधन केले जाते. यासाठी इतिहासतज्ज्ञ इतिहासाच्या दस्तऐवजांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करतात.

i. ऐतिहासिक दस्तऐवजाची भाषा व लिपी जाणून घेऊन त्याचा अर्थ लावला जातो.

ii. यासाठी दस्तऐवज लिहिणाऱ्याची भाषाशैली, अक्षरांचे वळण, कागदाच्या निर्मितीचा काळ व प्रकार, तसेच त्यावरील अधिकारदर्शक मुद्रा यांद्वारे दस्तऐवजाचा खरेपणा ठरवला जातो.

iii. यानंतर इतर ऐतिहासिक संदर्भांचे तौलनिक विश्लेषण केले जाते. त्या आधारे दस्तऐवजाची विश्वासार्हता पडताळली जाते.

**निष्कर्ष:** अशारीतीने, इतिहासतज्ज्ञ चिकित्सकपणे इतिहासाचे विश्लेषण करतात.

### २. इतिहासलेखन म्हणजे काय?

**उत्तर:**

i. इतिहासातील उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखन पद्धतीला इतिहासलेखन असे म्हणतात. इतिहासातील घटनांची चिकित्सापूर्वक मांडणी करणाऱ्या संशोधकाला इतिहासकार म्हटले जाते.

Sample Content

ii. पूर्वजांच्या जीवनाच्या पराक्रमाच्या गोष्टी पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आधुनिक इतिहासलेखनामध्ये विविध परंपरांचा साधनांच्या स्वरूपात उपयोग केला जातो.

iii. अतिप्राचीन काळापासून जगभरातील संस्कृतींमध्ये गुहाचित्रांद्वारे स्मृतींचे जतन, कहाण्यांचे कथन, गीत आणि पोवाड्यांचे गायन यांसारख्या परंपरा अस्तित्वात होत्या.

**३. इतिहासलेखनामध्ये इतिहासकाराची लेखनशैली कशी निश्चित होते?**

**उत्तर:**

i. भूतकाळातील उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सकपणे संशोधन करून इतिहासकार इतिहासाची मांडणी करतो.

ii. घडलेल्या प्रत्येक घटनेची नोंद करून तिचे ज्ञान मिळवण्यास मर्यादा येतात. त्यामुळे, इतिहासकार त्याला वाचकांपर्यंत जे पोहोचवायचे आहे, त्या दृष्टिकोनाच्या चौकटीत बसतील अशा काही घटनांची निवड करतो.

उदा. एखाद्या इतिहासकाराला शिवाजी महाराजांचा इतिहास वाचकांपर्यंत पोहोचवायचा असेल, तर तो त्यांच्या समकालीन राज्यकर्त्यांचा अभ्यास करतोच; मात्र इतिहासाची मांडणी करताना तो शिवाजी महाराजांना केंद्रस्थानी ठेवून तत्कालीन कालखंडाची मांडणी करतो.

iii. विशिष्ट वैचारिक दृष्टिकोनातून इतिहासकार निवडक घटनांची मांडणी करतो. या सर्व गोष्टींवर त्याची लेखनाची शैली निश्चित होते.

***४. आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये कोणती?**

**उत्तर: प्रस्तावना:** इतिहासातील उपलब्ध पुराव्यांचे संशोधनाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखन पद्धतीला 'इतिहासलेखन' असे म्हणतात. आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

i. आधुनिक इतिहासलेखन पद्धती ही शास्त्रशुद्ध असून तिची सुरुवात प्रश्नांची योग्य मांडणी करण्यापासून होते.

ii. हे प्रश्न भूतकाळातील विविध मानवी समाजातील लोकांनी विशिष्ट काळात केलेल्या कृतीविषयी असल्याने ते मानवकेंद्रित असतात. या कृतींचा संबंध देवदेवतांच्या कथा किंवा दैवी घटना यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न या इतिहासामध्ये केला जात नाही.

iii. मांडलेल्या प्रश्नांच्या इतिहासातील उत्तरांना विश्वसनीय पुराव्यांचा आधार असल्याने इतिहासाची मांडणी तर्कसुसंगत असते.

iv. इतिहासामधील मानवाच्या वाटचालीचा वेध घेण्यासाठी भूतकाळात मानवाने केलेल्या कृतींचा आधार घेतला जातो.

**निष्कर्ष:** अशारीतीने, आधुनिक इतिहासलेखनामध्ये शास्त्रशुद्धता आणि तर्कसुसंगता असल्याचे दिसून येते.

**५. रेने देकार्त यांनी इतिहासलेखनात कोणत्या मताचा आग्रह धरला?**

**उत्तर:**

i. रेने देकार्त या फ्रेंच तत्त्वज्ञाने इतिहासलेखनाकरता वापरल्या जाणाऱ्या ऐतिहासिक साधनांची विशेषकरून कागदपत्रांची विश्वासार्हता तपासणे आवश्यक आहे, या मताचा आग्रह धरला.

ii. 'डिस्कोर्स ऑन द मेथड' या आपल्या ग्रंथामध्येही त्याने 'एखाद्या गोष्टीची सत्यता नि:संशयरीत्या प्रस्थापित होत नाही तोपर्यंत ती स्वीकारू नये' हा नियम मांडला.

iii. शास्त्रशुद्ध संशोधनाच्या दृष्टीने हा नियम महत्त्वाचा मानला जातो.

**६. व्हॉल्टेअर यांना आधुनिक इतिहासलेखनाचे जनक असे का म्हटले जाते? [मार्च २०१९]**

**उत्तर:** या प्रश्नाच्या उत्तराकरता 'टिपा लिहा' मधील प्र.३ चे उत्तर अभ्यासा.

**७. हेगेलचे इतिहासलेखनविषयक योगदान सांगा.**

**उत्तर:**

i. जर्मन तत्त्वज्ञ जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल याने इतिहासलेखनासंदर्भात ऐतिहासिक वास्तव किंवा सत्य घटना तर्कशुद्ध पद्धतीने मांडणे गरजेचे आहे आणि इतिहासामधील घटनाक्रम हा प्रगतीचे टप्पे दर्शवतो हे विचार मांडले.

ii. वेळोवेळी उपलब्ध होत असलेल्या पुराव्यांनुसार इतिहासकाराला बदलत जाणे स्वाभाविक असते, असे प्रतिपादन केले. यामुळे, इतिहासाच्या अभ्यास पद्धती या विज्ञानाच्या पद्धतींपेक्षा वेगळ्या असल्या तरीही त्या कमी प्रतीच्या नाहीत अशी खात्री तत्त्वज्ञांना वाटू लागली.

iii. हेगेलने 'रिझन इन हिस्टरी' हे पुस्तक लिहिले आहे. याशिवाय, 'एनसायक्लोपीडिया ऑफ फिलॉसॉफिकल सायन्सेस' या ग्रंथात त्यांची व्याख्याने आणि लेखांचे संकलन करण्यात आले आहे.

***८. लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.**

**उत्तर: प्रस्तावना:** एकोणिसाव्या शतकामध्ये बर्लिन विद्यापीठातील इतिहासतज्ज्ञ लिओपॉल्ड व्हॉन रांके याने इतिहासलेखनाच्या चिकित्सक पद्धतीविषयक सांगितले आहे.

i. त्याने चिकित्सकपणे इतिहासातील घटनेच्या सत्यतेच्या शोधावर भर दिला आहे. यामध्ये मूळ दस्तऐवजांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती अधिक महत्त्वाची असते असे ठामपणे मांडले.

Sample Content

ii. ऐतिहासिक घटनांसंदर्भातील सर्व कागदपत्रे व दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले. या पद्धतीने ऐतिहासिक घटनेच्या सत्यापर्यंत पोहोचणे शक्य आहे असा विश्वासही त्याने व्यक्त केला.

iii. तसेच इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर टीका केली. त्याच्या विविध लेखांचे 'द थिअरी अँण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी' आणि 'द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथांमध्ये संकलन केले आहे.

**निष्कर्ष:** अशारीतीने, रांके याने चिकित्सक पद्धतीने इतिहासलेखन करण्यावर भर दिला.

***९. कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धांत स्पष्ट करा.**

**[मार्च २०१९]**

**उत्तर: प्रस्तावना:** इतिहासाच्या दृष्टिकोनात मूलभूत बदल घडवून आणणारी वैचारिक प्रणाली कार्ल मार्क्स याने अस्तित्वात आणली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात त्याने वर्गसिद्धांत मांडला.

i. कार्ल मार्क्सच्या मते:

अ. इतिहास हा अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा असतो.

ब. आपल्या मूलभूत गरजा भागवण्याकरता उपलब्ध असलेल्या उत्पादन साधनांच्या स्वरूपावर आणि त्यांच्या मालकीवर माणसामाणसांतील नातेसंबंध अवलंबून असतात.

क. समाजामधील विविध घटकांना ही उत्पादनाची साधने सारख्या प्रमाणात मिळत नाहीत. याचा परिणाम म्हणजे समाजात वर्ग निर्माण होतात. त्यामुळे, सामाजिक विषमतेतून या वर्गांमध्ये संघर्ष दिसून येतो.

ii. मानवी इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे. यामध्ये ज्या वर्गाच्या हाती उत्पादनाची साधने असतात, तो वर्ग इतर वर्गांचे आर्थिक शोषण करतो, असा विचार त्याने मांडला. मार्क्सने हा वर्गसिद्धांत 'दास कॅपिटल' या आपल्या ग्रंथात मांडला आहे.

**निष्कर्ष:** अशारीतीने, कार्ल मार्क्स याने आपल्या वर्गसिद्धांताद्वारे जगाला इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन दिला.

***१०. स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय?**

**उत्तर: प्रस्तावना:** इतिहासलेखनाच्या विकासामध्ये स्त्रीवादी इतिहासलेखनाने महत्त्वाची भूमिका बजावली.

i. स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना म्हणजे स्त्रीवादी इतिहासलेखन होय. स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सीमाँ - द - बोव्हा या फ्रेंच विदुषीने सिद्ध केली.

ii. या स्वरूपाच्या इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा समावेश करण्याबरोबरच या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाच्या पुनर्विचारावरही भर दिला गेला.

iii. या स्त्रीवादी दृष्टिकोनामुळे स्त्रियांच्या आयुष्यासंबंधित नोकरी, रोजगार, ट्रेड युनियन, कौटुंबिक आयुष्य इत्यादी पैलूंविषयक सखोल संशोधन सुरू झाले. १९९० नंतरच्या काळात 'स्त्री' हा एक स्वतंत्र सामाजिक वर्ग मानून स्त्रीवादी इतिहासलेखनावर अधिक भर दिला गेला.

**निष्कर्ष:** स्त्रीवादी इतिहासलेखनामुळे इतिहासलेखनाला एक नवा आयाम प्राप्त झाला.

**चित्राचे निरीक्षण करा व उत्तरे लिहा.**

**१. खालील चित्र ओळखा व दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे त्याची माहिती लिहा.**



**i. शिलालेखाचा कालखंड**

**ii. त्यावरील चित्र**

**iii. शिलालेखाचे सद्य ठिकाण**

**उत्तर:**

i. सदर शिलालेख हा सुमारे ४५०० वर्षांपूर्वीचा मेसोपोटेमियातील सुमेर संस्कृतीचा आहे.

ii. शिलालेखातील चित्रामध्ये हातात ढाल व भाला घेतलेल्या सैनिकांची शिस्तबद्ध रांग आणि त्यांचे नेतृत्व करणारे सेनानीदेखील दिसत आहेत.

iii. सध्या हा शिलालेख फ्रान्समधील 'लुव्र' या जगप्रसिद्ध संग्रहालयामध्ये ठेवलेला आहे.

**उपक्रम**

***तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका विषयावर विस्तृत माहिती मिळवा व त्याचा इतिहास लिहा.**

**उदा.**

- **पेन (लेखणी) चा इतिहास**
- **मुद्रणकलेचा इतिहास**
- **संगणकाचा इतिहास**

**[टीप:** या उपक्रमाच्या उत्तराकरता शेजारील Q. R. Code *Quill - The Padhai App* द्वारे स्कॅन करावा.**]**

Sample Content

# एक दृष्टिक्षेप

**संविधान**
- २६ जानेवारी १९५० पासून संविधानानुसार राज्यकारभार करण्यास सुरुवात.
- **उद्‌दिष्ट:** सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करणे.
- **तरतुदी:** स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये अबाधित राहावीत यासाठी तरतुदी.
- सामाजिक न्याय आणि समतेवर आधारलेला एक प्रागतिक विकसित समाज निर्माण करण्यासाठीचे एक साधन म्हणून संविधानाकडे पाहिले जाते.

पाठामध्ये संविधानाची वाटचाल या तीन मुद्द्यांसंदर्भात दिली आहे.

१. लोकशाही  २. सामाजिक न्याय व समता  ३. न्यायव्यवस्था

**लोकशाही**
- भारतीय लोकशाही ही संसदीय स्वरूपाची आहे.
- लोकशाही: समाजाच्या राजकीय जीवनाचा एक भाग.

**लोकशाहीची ठळक वैशिष्ट्ये:**

**राजकीय प्रगल्भता:**
- देशातील शासनसंस्था- संसद, राज्य विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये लोकांना थेट प्रतिनिधित्व.
- जनतेचा सहभाग आणि राजकीय पक्षांमधील स्पर्धेचा विचार करता भारतातील लोकशाही मोठ्या प्रमाणात यशस्वी.
- निवडणुका मुक्त आणि न्याय्य वातावरणात. निवडणुकांमुळे भारतीयांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ होतात.
- निवडणुकांमुळे भारतीयांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ होतात.

**मताधिकार:**
- १८ वर्षे पूर्ण असलेल्या कोणत्याही भारतीय व्यक्तीला मतदान करता येते. युवावर्गाला यामुळे राजकीय अवकाश प्राप्त झाले आहे.
- लोकशाहीच्या अशा व्याप्तीमुळे भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

**लोकशाही विकेंद्रीकरण:**
- सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा.
- संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लोकशाही विकेंद्रीकरणा संदर्भात तरतुदी.
- ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीमुळे स्थानिक शासनसंस्थांना मान्यता.

**माहितीचा अधिकार** (RTI, 2005):

शासन व नागरिक यांच्यात संवाद वाढवण्याच्या दृष्टीने, तसेच प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी व कारभारातील गोपनीयता कमी होण्यासाठी २००५ मध्ये माहितीचा अधिकार हा कायदा करण्यात आला.

Sample Content

**सामाजिक न्याय व समता**



- समाजात सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे हे संविधानाचे उद्‌दिष्ट.
- लोकशाही अधिकाधिक सर्वसमावेशक होण्यासाठी सर्व सामाजिक घटक मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे, समाजातील संघर्ष कमी होतो.

**सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी शासनाकडून केलेले प्रयत्न पुढीलप्रमाणे:**

**राखीव जागांचे धोरण:**

- वंचित राहिलेल्या समाजघटकांसाठी राखीव जागांचे धोरण.
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा.

**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावरील अत्याचारापासून सरंक्षण देणारा कायदा:**

- सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा कायदा.
- कायद्याद्‌वारे अत्याचारापासून प्रतिबंध करण्यात आला आहे.

**अल्पसंख्याकांविषयीच्या तरतुदी:**

- अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी भारतीय संविधानात तरतुदी.
- संविधानानुसार जात, धर्म, वंश, भाषा व प्रदेश यांसारख्या घटकांवर आधारित भेदभाव करण्यास प्रतिबंध केला आहे.

**महिलांसंबंधीचे कायदे व प्रतिनिधित्वविषयक तरतुदी:**

- महिलांमधील निरक्षरता दूर करणे व त्यांना विकासाची संधी देणे याकरता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर धोरणांची निश्चिती.
- वडिलांच्या व पतीच्या संपत्तीमध्ये समान वाटा, हुंडाप्रतिबंधक कायदा, लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देणारा कायदा, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा या महत्त्वपूर्ण तरतुदी.
- ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक शासन संस्थांमध्ये ३३% जागा महिलांसाठी राखीव. त्यानंतर या प्रमाणामध्ये ५०% पर्यंत वाढ.
- घरगुती हिंसाचारापासून महिलांना संरक्षण देणारा कायदा करून स्त्रीची प्रतिष्ठा व आत्मसन्मान राखला आहे.
- परिणामी, भारतीय लोकशाहीतील समावेशन (inclusion) अर्थपूर्ण.

**न्यायालयाची भूमिका:**



- लोकशाही बळकट करण्याच्या उद्‌देशाने सामाजिक न्याय व समता या दिशेने न्यायालयांचे कार्य महत्त्वाचे.
- संविधानातील मूळ उद्‌दिष्टे आणि संविधानकारांचे हेतू यांना प्राधान्य देऊन न्यायालये कार्यरत.

**संविधानाची मूलभूत चौकट:**

- संसदेला संविधानाच्या मूलभूत चौकटीला धक्का लावता येत नाही.
- संविधानात बदल करता येणे शक्य असल्यामुळे याचे स्वरूप एका जिवंत दस्तऐवजाप्रमाणे (living document) आहे.

**यामधील तरतुदी**

- अ. धर्मनिरपेक्षता व संविधानाची सर्वश्रेष्ठता
- ब. शासनाचे प्रजासत्ताक आणि लोकशाही स्वरूप
- क. संविधानाचे संघराज्यात्मक स्वरूप
- ड. देशाच्या ऐक्य व एकात्मतेचे संवर्धन
- इ. देशाचे सार्वभौमत्व

Sample Content

**महत्त्वपूर्ण न्यायालयीन निर्णय:**

मानवी हक्कांची जपणूक, बालकांचे हक्क, आदिवासीचें सक्षमीकरण, व्यक्तिस्वातंत्र्य महिलांची प्रतिष्ठा आणि त्यांचा सन्मान राखण्याची गरज. या दिशेने न्यायालयाच्या प्रयत्नामुळे भारतातील राजकीय प्रक्रिया परिपक्व होण्यास मदत झाली आहे.

**प्र.६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतात संविधानानुसार राज्यकारभार करण्यास _______ पासून सुरुवात झाली.
अ. २६ जानेवारी १९४९ ब. २६ नोव्हेंबर १९४९
क. २६ जानेवारी १९५० ड. १५ ऑगस्ट १९४७

२. भारतामध्ये मतदाराचे वय _______ वर्षे एवढे आहे.
अ. १७ ब. १८ क. १९ ड. २०

*३. लोकशाहीचा गाभा म्हणजे _______.
**[मार्च २०१९, २०२०, २०२२; जुलै २०२३]**
अ. प्रौढ मताधिकार
ब. सत्तेचे विकेंद्रीकरण
क. राखीव जागांचे धोरण
ड. न्यायालयीन निर्णय

४. सामाजिक न्याय आणि _______ हे आपल्या संविधानाचे उद्दिष्ट आहे.
अ. व्यापार ब. औद्योगिकीकरण
क. समता ड. अ आणि ब दोन्ही

५. ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीमुळे _______ संविधानाची मान्यता मिळालीच; पण त्याहीपेक्षा त्यांच्या अधिकारात खूप मोठी वाढ झाली.
अ. व्यापाराला
ब. माहितीच्या अधिकाराला
क. स्थानिक शासनसंस्थांना
ड. निवडणूक आयोगाला

६. माहितीचा अधिकार _______ मुळे शासनव्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.
अ. २००७ ब. २००५
क. २०१० ड. २०१२

*७. पुढील कोणत्या कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे? **[मार्च २०२३]**
अ. माहितीचा अधिकार कायदा
ब. हुंडा प्रतिबंधक कायदा
क. अन्नसुरक्षा कायदा
ड. यांपैकी कोणतेही नाही.

८. _______ घटनादुरुस्तीने महिलांसाठी शासनसंस्थेमध्ये ३३% पर्यंत जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या.
अ. १३ व्या व १४ व्या ब. ७३ व्या व ७४ व्या
क. ९२ व्या व ९३ व्या ड. ९९ व्या

*९. महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी _______ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.
**[जुलै २०२२]**
अ. २५% ब. ३०%
क. ४०% ड. ५०%

१०. _______ चे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.
अ. संविधाना ब. मतदाना
क. न्यायदाना ड. माहितीच्या अधिकारा

११. संविधानामध्ये बदल करण्याचे अधिकार _______ ला आहे.
**[डिसें.२०२०]**
अ. संसदे
ब. स्थानिक स्वराज्य संस्थे
क. विधानसभे
ड. सहकारी संस्थे

**उत्तर:** १. २६ जानेवारी १९५० २. १८
३. सत्तेचे विकेंद्रीकरण ४. समता
५. स्थानिक शासनसंस्थांना ६. २००५
७. हुंडा प्रतिबंधक कायदा
८. ७३ व्या व ७४ व्या
९. ५०%
१०. संविधाना
११. संसदे

**प्र.७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

***१. भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते. [मार्च २०२०, जुलै २०२३]**

**उत्तर:** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण:**

i. लोकशाहीमुळे शासनकारभारात जनतेचा प्रत्यक्षरीत्या सहभाग होतो. त्यानुसार संसद, राज्य विधानसभा आणि स्थानिक शासनसंस्था या लोकांना थेट प्रतिनिधित्व देणाऱ्या शासनसंस्था आहेत.

ii. ठरावीक मुदतीनंतर मुक्त आणि न्याय्य वातावरणामध्ये होणाऱ्या निवडणुका हे लोकशाहीचे यशच आहे.

iii. २१ वर्षे वयाची अट निश्चित करून प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषाला संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार आणखीनच व्यापक करत मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे करण्यात आले आहे. यामुळे, युवावर्गालाही राजकीय अवकाश लाभले आहे.

भारतातील लोकशाहीची व्याप्ती वाढवणाऱ्या, अशा बदलांमुळेच भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

**ज्ञानगुरू**

१९८८ मध्ये झालेल्या ६१ व्या घटना दुरुस्तीनुसार मतदाराचे वय हे २१ वर्षांवरून १८ करण्यात आले. याची अंमलबजावणी १९८९ पासून सुरू झाली.



*२. **माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारात गोपनीयता वाढली आहे.**

**उत्तर:** वरील विधान **चूक** आहे.

**कारण**

i. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही दोन सुशासनाची वैशिष्ट्ये आहेत; ती प्रत्यक्षात आणण्याकरता भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला आहे.

ii. यामुळे, प्रशासनाच्या कारभारात जनतेला प्रत्यक्ष सहभाग घेता येत नसला तरी आता त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे.

iii. माहितीच्या अधिकारामुळे शासनाचे व्यवहार खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली आहे.

म्हणूनच, माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारात गोपनीयता कमी झाली आहे.

*३. **संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते. [मार्च २०१९, २०२३; डिसें. २०२०]**

**उत्तर:** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण**

i. भारतीय संविधान हे प्रवाही आहे. परिस्थितीनुसार संविधानात बदल करावे लागतात; पण संविधानाच्या मूलभूत चौकटीमध्ये बदल करता येत नाही.

ii. संविधानात बदल करण्याचा अधिकार संसदेला आहे. मात्र, संविधानात बदल करताना संसदेने संविधानाच्या मूलभूत चौकटीला धक्का लागू देऊ नये, अशी भूमिका न्यायालयाने घेतली आहे.

म्हणून, परिस्थितीनुरूप यात होणाऱ्या बदलांमुळे संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

४. **न्यायालयाच्या विविध विषयांवरील निर्णयातून भारतातील राजकीय प्रक्रिया परिपक्व होण्यास मदत झाली आहे. [मार्च २०२२]**

**उत्तर:** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारण:**

i. संविधानातील मूलभूत हक्कांद्वारे नागरिकांना मिळालेले संरक्षण अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने न्यायालयाने अनेक निर्णय दिले आहे.

ii. न्यायालयाने ज्या काही महत्त्वाच्या विषयांवर निर्णय दिले आहेत; त्यामध्ये बालकांचे हक्क; मानवी हक्कांची जपणूक; महिलांची प्रतिष्ठा आणि त्यांचा सन्मान राखण्याची गरज; व्यक्तिस्वातंत्र्य; आदिवासींचे सक्षमीकरण यांसारख्या विषयांचा समावेश होतो.

म्हणूनच, न्यायालयाच्या विविध विषयांवरील निर्णयातून भारतातील राजकीय प्रक्रिया परिपक्व होण्यास मदत झाली आहे.

## प्र.८.(अ) संकल्पना स्पष्ट करा.

### १. भारतीय लोकशाही

**उत्तर:**

i. भारतीय लोकशाही ही सर्वांत मोठी लोकशाही आहे. भारतीय लोकशाहीमध्ये संसद, राज्य विधानसभा आणि स्थानिक शासनसंस्था या जनतेला थेट प्रतिनिधित्व देणाऱ्या संस्था आहेत. यांद्वारे, राजकारणात जनतेचा सहभाग वाढत आहे.

ii. भारताच्या लोकसंख्येचा विचार करता निवडणुका घेणे ही आव्हानात्मक बाब आहे. ठरावीक मुदतीनंतर मुक्त व न्याय्य वातावरणात होणाऱ्या निवडणुका ह्या भारतीय लोकशाहीचे यश आहे.

iii. मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्याने भारतीय लोकशाही आणखी व्यापक बनली आहे.

iv. लोकशाही विकेंद्रीकरणामुळे सत्तेच्या गैरवापराला आळा बसला आहे.

### २. मताधिकार [डिसें. २०२०]

**उत्तर:**

i. भारतीय संविधानाने प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मत देण्याचा अधिकार दिला आहे.

ii. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषाला २१ वर्षे वयाची अट निश्चित करून मताधिकार दिला होता.

iii. मतदाराचे वय २१ वरून १८ करून मताधिकार आणखी व्यापक करण्यात आला.

iv. त्यामुळेच, लोकशाहीची व्याप्ती वाढून युवावर्गाला राजकीय अवकाश प्राप्त झाले.

Sample Content

**३. लोकशाही विकेंद्रीकरण**

**उत्तर:**

i. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा लोकशाहीचा गाभा आहे. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लोकशाही विकेंद्रीकरणासंबंधित तरतुदी करण्यात आल्या आहेत.

ii. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वतंत्र भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाचे खूप प्रयत्न झाले असून यामध्ये सर्वांत मोठा प्रयत्न ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीचा होता.

iii. या दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासनसंस्थांना संविधानाची मान्यता मिळाली, शिवाय त्यांच्या अधिकारामध्येही खूप मोठी वाढ झाली.

iv. विकेंद्रीकरणामुळे, सत्तेचा गैरवापर करण्याला आळा बसतो, शिवाय सामान्य जनतेलाही या सत्तेत सहभागी होता येते.

***४. माहितीचा अधिकार (२००५)**

**[मार्च २०१९, २०२०; जुलै २०२२, २०२३]**

**उत्तर:**

i. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही सुशासनाची दोन वैशिष्ट्ये आहेत. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला आहे.

ii. माहितीचा अधिकार हा लोकशाहीमध्ये नागरिकांचे सक्षमीकरण करण्याचा एक प्रयत्न आहे. यामुळे, जनतेचा राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग वाढत आहे.

iii. शासन आणि नागरिक यांच्यातील संवादामुळे लोकशाही अधिक सकस, सुदृढ व बळकट होण्यास मदत होत आहे.

iv. याबरोबरच शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी होऊन शासनाचे व्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

***५. हक्काधारित दृष्टिकोन**

**उत्तर:**

i. स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांमध्ये भारताचे लोकशाहीकरण व्हावे यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या.

ii. परंतु, यामध्ये नागरिकांकडे 'लाभार्थी' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन होता.

iii. मात्र, गेल्या काही दशकांमध्ये या सुधारणा 'नागरिकांचा हक्कच आहे' या भूमिकेतून केल्या जातात.

iv. यानुसार भारतीय नागरिकांना माहितीचा, शिक्षणाचा व अन्नसुरक्षेचा अधिकार मिळाला आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

या हक्काधारित दृष्टिकोनामुळे शासन व नागरिक यांच्यात संवाद निर्माण होऊन नागरिक आपल्या मागण्या मांडू शकतात. हक्काधारित दृष्टिकोनामुळे लोकशाही अजून बळकट होण्यास मदत होत आहे.

उदा. शासन स्तरावर राबवल्या जाणाऱ्या योजनांकडे नागरिकही योजना आपली व आपल्या विकासासाठी आहे अशा दृष्टीने पाहत आहेत.

**६. राखीव जागांविषयक धोरण**

**उत्तर:**

i जो लोकसमूह शिक्षण व रोजगार यांपासून वंचित राहिला आहे त्यांच्यासाठी राखीव जागांसंबंधित धोरण आखले आहे.

ii. या धोरणानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरता सरकारी नोकऱ्यांमध्ये काही जागा राखीव ठेवल्या आहेत.

iii. शिवाय, इतर मागासवर्गीयांसाठीदेखील राखीव जागांची तरतूद केली आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे हे भारतीय लोकशाहीचे मुख्य उद्दिष्ट आहे. लोकशाही सर्वसमावेशक होण्याकरता समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राखीव जागांचे धोरण आखण्यात आले आहे.

**७. अल्पसंख्याकविषयक तरतुदी**

**उत्तर:** लोकशाही ही सर्व समाजघटकांना सामावून घेण्याची प्रक्रिया असून ती अधिकाधिक सर्वसमावेशक करण्यासाठी काही प्रयत्न झाले. त्यातील एक प्रयत्न म्हणजे अल्पसंख्याकविषयक तरतुदी होय. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

i. अल्पसंख्याकांना शिक्षणाच्या व रोजगाराच्या संधी मिळाव्यात यांसाठी शासनाने अनेक योजना करून त्यांची अंमलबजावणी केली आहे.

ii. जात, धर्म, वंश, भाषा व प्रदेश इत्यादी घटकांवरून भेदभाव करण्यास प्रतिबंध केला आहे आणि अल्पसंख्याकांसाठी ही फार व्यापक तरतूद आहे.

iii. यामुळे, अल्पसंख्याकांना स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क आणि सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क यांद्वारे अल्पसंख्याकांना मूलभूत स्वरूपाचे संरक्षण मिळाले आहे.

**ज्ञानगुरू**

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम १९९२ (National Commission for Minorities Act, 1992) मधील कलम २ (क) नुसार मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी आणि जैन हे ६ समुदाय अल्पसंख्याक लोकसमुदाय म्हणून घोषित केले आहेत.



Sample Content

***८. लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व**

**उत्तर:**

i. ७३ व्या व ७४ व्या संविधान दुरुस्तीनुसार स्थानिक शासनसंस्थेत महिलांना ३३% व पुढे जाऊन आता ५०% आरक्षण मिळाल्यामुळे शासनसंस्थेत महिलांचा सहभाग वाढत आहे.

ii. महिलांच्या प्रतिनिधित्वामुळे महिला सक्षमीकरणास वेग मिळत आहे.

iii. सांख्यिकी माहितीनुसार (पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७२) १९५१ ते २०१४ या ६३ वर्षांच्या कालावधीत महिला खासदारांच्या संख्येत जवळपास तीन पट वाढ झाली आहे.

iv. १९५१-५२ साली महिला खासदारांची लोकसभेतील संख्या २२ (४.५%) होती. २०१४ साली ही संख्या ६६ (१२.१५%) इतकी आहे.

वरील आकडेवारीवरून स्त्रियांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व सातत्याने वाढत आहे, असे दिसते.

**ज्ञानगुरू**

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तिसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, ओडिशा, राजस्थान, सिक्कीम, तमिळनाडू, त्रिपुरा, उत्तराखंड व पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण आहे.




***[स्रोत:* Panchayat.gov.in*]***

**प्र.८.(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**तक्ता पूर्ण करा.**

१.

| | कायदे | उद्दिष्टे |
|---|---|---|
| i. | .................. | शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी करून तो अधिक पारदर्शक होण्यास मदत |
| ii. | घरगुती हिंसाचार प्रतिबंधक | ...................... |

२.

| | |
|---|---|
| संविधानाचे उद्दिष्ट | ...................... |
| मतदानासाठीचे वय | ...................... |
| संसदेला धक्का लावता येणार नाही असा संविधानाचा भाग | ...................... |

३.

| | कायदा | | उद्देश |
|---|---|---|---|
| i. | ........................ | अ. | शासनाच्या कामाकाजामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व ही सुशासनाची वैशिष्ट्ये आणणे. |
| ii. | अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा | ब. | .................................. |

**उत्तर:**

१.

| | कायदे | उद्दिष्टे |
|---|---|---|
| i. | **माहितीचा अधिकार** | शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी करून तो अधिक पारदर्शक होण्यास मदत |
| ii. | घरगुती हिंसाचार प्रतिबंधक | **पारंपरिक वर्चस्व आणि अधिकारशाहीला नाकारणे** |


२.

| | |
|---|---|
| संविधानाचे उद्दिष्ट | **सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्याची निर्मिती** |
| मतदानासाठीचे वय | **१८ वर्षे** |
| संसदेला धक्का लावता येणार नाही असा संविधानाचा भाग | **संविधानाची मूलभूत चौकट** |

३.

| | कायदा | | उद्देश |
|---|---|---|---|
| i. | **माहितीचा अधिकार २००५** | अ. | शासनाच्या कामाकाजामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व ही सुशासनाची वैशिष्ट्ये आणणे. |
| ii. | अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा | ब. | **सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे** |

**संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




Sample Content

**उत्तर:**

i. संविधानाचे संघराज्यात्मक स्वरूप

ii. देशाच्या ऐक्य व एकात्मतेचे संवर्धन

iii. देशाचे सार्वभौमत्व

iv. धर्मनिरपेक्षता आणि संविधानाची सर्वश्रेष्ठता

**कालरेषा पूर्ण करा.**

| | |
|---|---|
| १९५० | i |
| ii | या नंतरच्या काळात नागरिकांसाठी सुधारणा करताना तो त्यांचा हक्क मानून सुधारणा करण्याकडे कल वाढला. |
| iii | माहितीचा अधिकार |
| iv | यावर्षी लोकसभेतील महिला खासदारांची संख्या सर्वाधिक होती. |

**उत्तर:**

i. भारतात संविधानानुसार राज्यकारभारास सुरुवात झाली.

ii. २०००

iii. २००५

iv. २०१४

**प्र.९. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**१. भारतीय संविधानाची उद्दिष्टे सांगा.**

**उत्तर:** भारतात २६ जानेवारी १९५० पासून संविधानानुसार राज्यकारभाराला सुरुवात झाली, या संविधानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:

i. भारतीय संविधानामध्ये धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवणे.

ii. नागरिकांना न्याय मिळवून त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे.

iii. सामाजिक न्यायाबरोबरच समतेवर आधारलेला एक प्रागतिक विकसित समाज निर्माण करणे.

iv. लोकांमधील जात, धर्म, वंश, भाषा व प्रदेश यांतील भेद नष्ट करून बंधुतेची भावना निर्माण करणे.

***२. मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले?**

**उत्तर:** मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे करून हा अधिकार आणखी व्यापक केला आहे. याचे परिणाम पुढीलप्रमाणे झाले.

i. यामुळे, भारतामधील युवावर्गाला राजकीय अवकाश प्राप्त झाले.

ii. या बदलामुळे भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जात असून हा बदल केवळ संख्यात्मक नसून गुणात्मक स्वरूपाचाही ठरला आहे.

iii. अनेक राजकीय पक्ष या युवा मतदारांच्या पाठिंब्यामुळे सत्तेच्या स्पर्धेत उतरले आहेत.

iv. भारतातील राजकीय स्पर्धेचे स्वरूपही यामुळे बदलून लोकांच्या इच्छा-आकांक्षांना प्रतिनिधित्व देण्याच्या हेतूने आज अनेक पक्ष स्पर्धेत दिसत आहेत.

अशारीतीने, युवा मतदारांच्या सहभागामुळे भारतीय लोकशाहीची व्याप्ती वाढली आहे.

***३. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय?**

**[मार्च २०२३]**

**उत्तर:**

i. ज्या ज्या सामाजिक बाबींमुळे व्यक्तीवर अन्याय होतो, तो दूर करून व्यक्ती म्हणून सर्वांचा समान दर्जा आहे याचा आग्रह धरणे म्हणजेच सामाजिक न्याय प्रस्थापित करणे होय.

ii. जात, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान, वंश, संपत्ती इत्यादींच्या आधारे श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेद न करणे, विकासाची समान संधी उप्लब्ध करून देणे हे न्याय व समतेमागील उद्दिष्ट आहे.

iii. संविधानाने सामाजिक न्याय व समता या मूल्यांवर आधारित एक नवा समाज निर्माण करण्याचा मार्ग स्पष्ट केला आहे.

iv. यासाठी सर्व समाजघटकांना सामावून घेण्याबाबत काही प्रयत्न केले जातात.

उदा. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावरील अत्याचारांपासून संरक्षण देणारा कायदा, वंचित घटकांकरता शिक्षण व रोजगारामध्ये राखीव जागांची तरतूद, अल्पसंख्याकांना समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क यांबाबत तरतूद, तसेच स्त्रियांसाठीचे विविध कायदे इत्यादी.

**४. भारतातील न्यायालयाची भूमिका स्पष्ट करा?**

**उत्तर:**

i. भारतातील **लोकशाही बळकट करण्याच्या प्रक्रियेत** न्यायालयांची भूमिका प्रमुख ठरते.

ii. संविधानाच्या **सामाजिक न्याय व समता या उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये** न्यायालय मोलाची भूमिका पार पडते.

iii. संविधानकारांचा हेतू व संविधानातील **मूळ उद्दिष्टे यांना प्राधान्य** देऊन संविधानातील **तरतुदींचा अर्थ लावण्याचे काम** न्यायालयाने केले आहे.

iv. संविधानाचे स्वरूप प्रवाही असून ते जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते. परिस्थितीनुसार संसदेकडून संविधानात बदल केला जातो;

Sample Content

परंतु **संविधानाच्या मूलभूत चौकटीला संसदेला धक्का लावता येणार नाही अशी भूमिका न्यायालयाची आहे.**

v. तसेच, **नागरिकांचे मूलभूत हक्कांचे संरक्षण** करण्याची प्रमुख भूमिकादेखील न्यायालय पार पाडते.

vi. न्यायालय काही महत्त्वाच्या विषयांवर निर्णय देण्याचे कार्य करते; त्यामध्ये बालक, स्त्रिया, आदिवासी यांचे हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य यांसारख्या बाबींचा समावेश होतो.

अशाप्रकारे, भारतीय न्यायालये राज्यघटनेच्या उद्देशिकेमध्ये नमूद केलेली सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी कार्य करतात. त्यामुळे, भारतीय लोकशाही बळकट होते.

***५. न्यायालयाने दिलेल्या कोणत्या निर्णयामुळे महिलांच्या सन्मान व प्रतिष्ठेची जपणूक झालेली आहे? [मार्च २०२२]**

**किंवा**

**कोणत्या कायद्यांमुळे महिलांना आपले स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे? [मार्च २०१९]**

**उत्तर:** न्यायालये ही व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करतात. यादृष्टीने न्यायालयाने अनेक निर्णय दिले आहेत.

i. महिला सक्षमीकरणासाठी, समाजात महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी न्यायालयाने काही कायदे केले आहेत. उदा. हुंडा प्रतिबंधक कायदा हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. स्त्रीची प्रतिष्ठा व आत्मसन्मान राखण्याची आवश्यकता या कायद्याने अधोरेखित केली आहे.

ii. वडिलांच्या व पतीच्या संपत्तीत महिलांना समान वाटा देणारा कायदा, लैंगिक अत्याचारापासून सरंक्षण देणारा कायदा, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा इत्यादी महत्त्वपूर्ण तरतुदी व निर्णयांमुळे महिलांच्या सन्मान व प्रतिष्ठेची जपणूक झाली आहे.

**६. सुशासनाच्या दृष्टिकोनातून शासनाने कोणती महत्त्वाची पावले उचलली आहेत?**

**उत्तर:** भारताने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीस बळकटी येण्याकरता सुप्रशासनाची आवश्यकता असते. यासाठी शासनाने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. ती पुढीलप्रमाणे:

**i. मताधिकार:** भारतीय संविधानाने प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मत देण्याचा अधिकार दिला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषाला २१ वर्षे वयाची अट निश्चित करून मताधिकार दिला होता. मतदाराचे वय २१ वरून १८ करून मताधिकार आणखी व्यापक करण्यात आला. त्यामुळेच, लोकशाहीची व्याप्ती वाढून युवावर्गाला राजकीय अवकाश प्राप्त झाले.

**ii. लोकशाहीचे विकेंद्रीकरण:** विकेंद्रीकरणामुळे सत्तेच्या गैरवापराला आळा बसतो, तसेच सामान्य लोकांनाही सत्तेमध्ये सहभाग घेण्याची संधी मिळते, म्हणूनच सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा आहे असे म्हटले जाते. राज्यधोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येदेखील लोकशाही विकेंद्रीकरणाबाबत तरतूद करण्यात आली आहे. ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीने स्थानिक शासनसंस्थांना संविधानिक मान्यता तर दिलीच, शिवाय त्यांच्या अधिकारांमध्येदेखील फार मोठी वाढ केली.

**iii. माहितीचा अधिकार कायदा (R.T.I. 2005):** पारदर्शकता व उत्तरदायित्व ही सुशासनाची वैशिष्ट्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी, शासन व नागरिक यांच्यातील अंतर कमी करून संवाद वाढवण्यासाठी आणि लोकशाहीचे आणखी सक्षमीकरण करण्यासाठी भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला. यामुळे, शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली व शासनाचे व्यवहार अधिक पारदर्शी होण्यास मदत झाली.

**iv.** सुशासनाच्या दृष्टिकोनातून शासनाने मताधिकार, लोकशाहीचे विकेंद्रीकरण, माहितीचा अधिकार यांबरोबरच शिक्षणाचा व अन्नसुरक्षेचा अधिकारही नागरिकांना दिला आहे.

**ज्ञानगुरू**



**सुशासनाची संकल्पना** ही अतिप्राचीन संकल्पना आहे. प्राचीन भारतीय संस्कृतींमध्ये या संकल्पनेचा उल्लेख आपणास दिसून येतो. या प्राचीन संस्कृतींमधील राज्यकर्ते सुशासनास त्यांचा 'राजधर्म' मानत असत. सुशासनाद्वारे अविरत लोककल्याण साधणे ही त्यांची विचारधारा होती. याची माहिती आपणास बहुतेक प्राचीन ग्रंथ साहित्यातून मिळते. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथामध्ये सुशासनाचे महत्त्व प्रतिपादित केले आहे. "जनतेच्या आनंदामध्येच राजाचा आनंद सामावलेला असतो. जनकल्याणामध्येच राजाचे कल्याण असते. राजास आनंदमयी वाटणाऱ्या गोष्टी योग्य न मानता, जनतेस आनंद देणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्यावे." असे मत कौटिल्याने व्यक्त केले आहे.

Sample Content

**पाठांतर्गत प्रश्न**

**१. खालील बदल कशामुळे झाले ते सांगू शकाल का?**

- **राज्यकारभारात महिलांचा सहभाग वाढावा म्हणून त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.**
- **दुर्बल समाजघटकांना सत्तेत सहभागी होता यावे, म्हणून त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.**
- **राज्य निवडणूक आयोग निर्माण करण्यात आला.**
- **संविधानात अकरा व बारा अशा नव्या दोन परिशिष्टांची भर पडली.**

**उत्तर:** वरील सर्व बदल हे १९९२ साली संसदेमध्ये मंजूर झालेल्या विधेयकानुसार केलेल्या ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे झाले आहे.

**२. माहीत आहे का तुम्हांला?**

**हक्काधारित दृष्टिकोन (Rights based approach): स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांमध्ये भारताचे लोकशाहीकरण व्हावे म्हणून अनेक सुधारणा झाल्या; परंतु त्यात नागरिकांकडे 'लाभार्थी' म्हणून पाहण्याची दृष्टी होती. गेल्या काही दशकांतील सुधारणा मात्र 'नागरिकांचा तो हक्कच आहे' या भूमिकेतून येत आहेत.**

**अशा प्रकारच्या दृष्टिकोनामुळे शासन व नागरिक यांच्या संबंधात कोणते बदल होतील, असे तुम्हांला वाटते?**

**उत्तर:**

i. संविधानाने मानवास जीवन जगत असताना काही मूलभूत हक्क बहाल केले आहेत. या हक्कांचे संरक्षण न्यायालय करते. हे हक्क कोणत्याही व्यक्तीकडून हिरावून घेतले जाऊ शकत नाहीत.

ii. संविधानाने दिलेल्या हक्कांचे शासन एकप्रकारे संरक्षण करते. त्या हक्काच्या अंमलबजावणीसाठी विविध योजना राबवते.

iii. स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांत, भारतातील लोकशाहीला बळकट करण्यासाठी अनेक सुधारणा केल्या. यात नागरिकांना लाभार्थी म्हणूनच पाहिले जाई.

iv. मात्र, गेल्या काही दशकांतील सुधारणा ह्या मात्र नागरिकांचा तो हक्कच आहे या भूमिकेतून करण्यात येत आहेत.

v. हक्कामुळे शासन नागरिकांबाबत काही निर्णय घेऊ शकते, तर नागरिक आपल्या मागण्या मांडू शकतात.

vi. हक्काधारित दृष्टिकोनामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यात पारदर्शकता येऊन लोकशाहीला नवे वळण मिळेल व ती अधिक व्यापक होण्यास मदत होईल.

**३. चर्चा करा.**

**भारतीय नागरिकांना रोजगार मिळवण्याचा हक्क असावा असे तुम्हांस वाटते का?**

**सर्वांना निवाऱ्याचा हक्क मिळाला, तर आपल्या देशातील लोकशाहीवर त्याचे कोणते परिणाम होतील असे तुम्हांला वाटते?**

**उत्तर:**

i. भारतीय नागरिकांना रोजगार मिळवण्याचा हक्क असावा असे वाटते.

ii. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या आणि त्यामुळे निर्माण होणारी बेरोजगारी हे देशासमोर मोठे आव्हान आहे.

iii. संविधानातील 'राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' यामध्ये नागरिकांच्या रोजगारासाठी तरतूद केली आहे. त्यात शासनाने जनतेस उपजीविकेचे साधने निर्माण करून द्यावीत असे स्पष्ट केले आहे. या कलमांच्या ध्येयपूर्तीसाठी शासन कटिबद्ध आहे. यासाठी शासन निरनिराळ्या योजनाही राबवत आहे. उदा. महात्मा गांधी 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना'. रोजगार मिळवण्याचा हक्क शासन आणखी विविध योजना राबवून व्यक्तींना उदरनिर्वाह करण्याची साधने निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.
उदा. कौशल्य विकास योजना

iv. तसेच, सर्वांना निवाऱ्याचा हक्क मिळाला पाहिजे असे वाटते. माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा यांबरोबरच शिक्षण या मूलभूत गरजा आहेत. निवाऱ्याच्या हक्कामुळे शासनाला प्रत्येकास घरे निर्माण करून द्यावी लागतील. देशातील बरीचशी अशी कुटुंबे आहेत जी अजूनही रस्त्यावर आहेत. बराचसा समाज जंगलात, तसेच झोपड्यांमध्ये वास्तव्यास आहे.

v. योग्य निवाऱ्याअभावी या समाजाला आरोग्य, शिक्षण, सुरक्षा यांना मुकावे लागते.

vi. त्यांना विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय व नैसर्गिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

vii. सर्वांना निवाऱ्याचा हक्क मिळाला, तर लोकशाहीला वेगळेच वळण मिळेल. नागरिक शासनाबाबत साशंक राहणार नाहीत. त्यामुळे, समाजाचा एकूणच दर्जा वाढेल व देशाच्या विकासास नवे वळण मिळेल.

viii. राहणीमानाचा दर्जा उंचावणे गरजेचे आहे. यासाठी शासन 'प्रधानमंत्री आवास योजना' यांसारखी योजना राबवत आहे.

Sample Content

४. **करून पाहा.**

**वरील कायदयातील तरतुदी वाचा. शिक्षकांच्या मदतीने त्या समजून घ्या. अत्याचार होऊच नयेत, म्हणून कोणत्या प्रयत्नांची गरज आहे?**

**उत्तर:**

i. अत्याचाराला रोखण्यासाठी शासनाने विविध कायदे केले असले तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी प्रत्येकाने आपल्या स्तरावर करण्याची गरज आहे.

ii. या प्रकारचे अत्याचार रोखण्याकरता समाजाकडून समता, न्याय व बंधुता ही संविधानिक मूल्ये अंगीकारणे आवश्यक आहे.

iii. येणाऱ्या पिढीला लहानपणापासूनच ही मूल्ये जोपासण्यास देणे यामुळे त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

iv. यासंबंधित काम करणाऱ्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातूनही जनजागृती करण्याचा प्रयत्न करता येईल; किंबहुना असा प्रयत्न होत आहे.

v. अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये गुन्हेगारी सिद्ध झालेल्यांना कठोर शिक्षा करणे जेणेकरून समाजामध्ये या प्रकारचा अत्याचार करण्यास कोणीही धजावू शकणार नाही आणि अत्याचाराच्या घटना समाजात घडणार नाहीत.

५. **करून पाहा.**

**शेजारील तक्ता काळजीपूर्वक वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

| क्र. | वर्ष | महिला खासदारांची संख्या | महिला खासदारांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १९५१-५२ | २२ | ४.५० % |
| २. | १९५७ | २२ | ४.४५ % |
| ३. | १९६२ | ३१ | ६.२८ % |
| ४. | १९६७ | २९ | ५.५८ % |
| ५. | १९७१ | २८ | ५.४१ % |
| ६. | १९७७ | १९ | ३.५१ % |
| ७. | १९८० | २८ | ५.२९ % |
| ८. | १९८४ | ४३ | ७.९५ % |
| ९. | १९८९ | २९ | ५.४८ % |
| १०. | १९९१ | ३९ | ७.३० % |
| ११. | १९९६ | ४० | ७.३७ % |
| १२. | १९९८ | ४३ | ७.९२ % |
| १३. | १९९९ | ४९ | ९.०२ % |
| १४. | २००४ | ४५ | ८.२९ % |
| १५. | २००९ | ५९ | १०.८७% |
| १६. | २०१४ | ६६ | १२.१५ % |

**i. सर्वांत कमी महिला खासदारांची संख्या कोणत्या वर्षीच्या निवडणुकीत आढळते?**

**उत्तर:** १९७७ च्या निवडणुकीत सर्वांत कमी महिला खासदारांची संख्या (१९) आढळते.


**ii. सर्वाधिक महिला खासदारांची संख्या कोणत्या वर्षीच्या निवडणुकीत आढळते?**

**उत्तर:** सर्वाधिक महिला खासदारांची संख्या (६६) २०१४ च्या निवडणुकीत आढळते.

Sample Content

**iii.** **तक्त्यातील माहितीच्या आधारे लोकसभा निवडणुकीतील महिला खासदार (१९५१–२०१४) वृत्तालेख (Pie Chart) / स्तंभालेख (Bar Chart) तयार करा.**

**उत्तर:**





१९५१-५२ च्या महिला खासदारांचा अंशात्मक कोन

$$= \frac{\text{१९५१ – ५२ मधील महिला खासदार}}{\text{आतापर्यंतच्या एकूण महिला खासदार}} \times ३६०^\circ$$

$$= \frac{२२}{५९२} \times ३६०^\circ$$

$$= १३.३७ \approx १३^\circ$$

[ याचप्रकारे प्रत्येक वर्षांमधील लोकसभेतील महिला खासदारांचा अंशात्मक कोन काढावा. ]



**महिला खासदारांच्या संख्येवर आधारित वृत्तालेख**

**६. तुम्हांला काय वाटते?**

**सार्वजनिक जीवनातील महिलांची दृश्यमानता (visibility) कमीच राहिलेली आहे. कुटुंब रचना, सामाजिक परिसर, आर्थिक क्षेत्र आणि राजकीय अवकाश अधिकाधिक खुले होत गेल्यास महिलांना निर्णयप्रक्रियेत सामील होऊन एकूण राज्यकारभाराला वेगळी दिशा देण्याची संधी मिळेल. यासाठी प्रातिनिधिक संस्थांमधील महिलांचा सहभाग वाढला पाहिजे.**

**उत्तर:**

i. राज्यसंस्थेमध्ये महिलांचा प्रतिनिधित्व सहभाग वाढवणे ही काळाची गरज आहे. स्थानिक शासनसंस्थांमध्ये मिळालेल्या आरक्षणामुळे स्थानिक पातळीवर महिलांचा सहभाग वाढत आहे.

ii. काही ठिकाणी महिला या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या परंपरेत गुंतलेल्या दिसतात. त्यांच्यात असणाऱ्या सुप्तगुणांना वाव मिळत नाही. याचे कारण समाजाची स्त्रियांबाबतची मानसिकता असू शकते.

iii. मात्र, बहुतांशी स्त्रिया ह्या धाडसी, निर्णयक्षम, कार्यदक्ष असतात. घरकाम करणाऱ्या स्त्रियाही काहीसे लघुउपक्रम चालवून कुटुंबास आर्थिक हातभार लावतात. दिवसेंदिवस परिस्थिती बदलत आहे. स्त्रिया विविध क्षेत्रांत उतरून आपली कामगिरी बजावत आहेत.

iv. विविध योजना आखून त्याद्‌वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यास प्रोत्साहन मिळाल्याने अनेक महिला लघु-मध्यम उपक्रम करून स्वयंरोजगार करताना दिसत आहेत, तसेच प्रशासनातही काम करताना महिलांचा प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षपणा, पारदर्शकपणा आढळून येतो.

उदा. भारतामध्ये महिला प्रशासकीय अधिकारी मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्या, बँका, संशोधन संस्था यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. या गुणांचा उपयोग केल्यास यातून राज्यकारभाराला वेगळीच दिशा मिळू शकेल, म्हणून प्रतिनिधी संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढला पाहिजे, असे वाटते.

**७. समजून घ्या! काही महत्त्वाचे आहे.**

**सुशासनाची वैशिष्ट्ये लोकशाहीत आणण्यासाठी काय करावे लागेल?**

[**टीप:** उत्तराकरता पाठाच्या शेवटी दिलेला Q. R. Code स्कॅन करावा.]

**उपक्रम**

***१. माहितीच्या अधिकारातून कोणत्या प्रकारची माहिती मिळवता येते, याची शिक्षकांच्या मदतीने माहिती मिळवा.**

***२. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शासन कोणत्या सोई-सवलती देते त्यांची यादी करा.**

[**टीप:** वरील दोन्ही उत्तराकरता पाठाच्या शेवटी दिलेला Q. R. Code स्कॅन करावा.]

***३. राष्ट्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळास भेट देऊन त्याबद्दल अधिक माहिती मिळवा.**

[**टीप:** विद्यार्थ्यांना **www.eci.nic.in** या संकेतस्थळाला भेट देऊन राष्ट्रीय निवडणूक आयोगाविषयक माहिती मिळवता येईल.]

***४. आपल्या परिसरातील स्थानिक शासनसंस्थांमध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला प्रतिनिधींची भेट घेऊन त्यांची मुलाखत घ्या?**

[**टीप:** खालील मुद्द्यांच्या साहाय्याने, तसेच शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना हा उपक्रम करता येईल.]

- महिला प्रतिनिधीचे नाव
- शिक्षण
- शासन संस्था स्तरावरील जबाबदारी
- यासाठी पाठिंबा दिलेल्या व्यक्ती
- शासकीय कारभाराबाबतचे मत
- पुढील कार्याबाबतचे मत किंवा नियोजन

[**टीप:** पाठांतर्गत प्रश्नातील प्रश्न ७ व उपक्रम क्र. १ व २ यांच्या उत्तराकरता Q. R. Code *Quill - The Padhai App* द्वारे स्कॅन करावा.]

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Med.)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  - Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- 3 in 1 Writing Skills
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- 3 in 1 Grammar (Language Study) & Vocabulary
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्) – SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्) – SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning




Explore our range of
STATIONERY


B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z, Wagle Industrial Estate, Thane (W)-400604 | 88799 39712 / 14 | 88799 39713 / 15

www.targetpublications.org  mail@targetpublications.org


Visit Our Website